अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित मुंबई

दि. २१ सप्टेंबर, २०२२ पासूनच्या वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजनेच्या (IR-I)
सुधारीत मार्गदर्शक सुचना

- **अटी, शर्ती व पात्रता :**

१. या योजनेअंतर्गत अर्ज करण्यासाठी संबंधित लाभार्थ्यांने यापूर्वी, या किंवा इतर कोणत्याही महामंडळाच्या योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

२. प्रामुख्याने मराठा तथा ज्या प्रवर्गाकरीता राज्यामध्ये कोणतेही महामंडळ कार्यरत नाही, अशा प्रवर्गातील उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील.

३. **या योजनेअंतर्गत वयोमर्यादेची अट पुरुषांकरीता कमाल ४५ तर स्त्रीयांकरीता कमाल ५५ वर्षे असेल.**

४. लाभार्थ्याचे कौंटूबिक वार्षिक उत्पन्न शासनाने वेळोवेळी निश्चीत केलेल्या नॉन-क्रिमिलेअरच्या मर्यादेत (जे रु. ८ लाखाच्या मर्यादेत असल्याचे सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र) अथवा वैयक्तीक ITR (पती व पत्नीचे) प्रमाणे वार्षिक सकल उत्पन्न (Gross Income) ग्राह्य धरण्यात येईल व निव्वळ उत्पन्न (Net Taxable Income) ग्राह्य धरण्यात येणार नाही.

५. वार्षिक कौंटुबिक उत्पन्नाची मर्यादा रु. ८ लाखाच्या मर्यादेत असल्याकारणाने, आर्थिक दुर्बल घटकाच्या व्याख्येचे अवलोकन करुन, लाभार्थ्यांचे व्यावसायिक कर्ज कमाल रु. २५ लाखाच्या मर्यादेतील असणे अनिवार्य असेल. जर कोणत्याही लाभार्थ्यांचे रु. २५ लाखाच्या वरील व्यावसायिक कर्ज असल्यास अशा कर्जांचा समोवश या योजनेअंतर्गत करण्यात येणार नाही.

६. या योजनेअंतर्गत निम्न-कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटूंबातील उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

७. या योजनेअंतर्गत केवळ बँकेमार्फत मंजूर झालेल्या कर्जांवरील व्याज परतावा करण्यात येईल.

८. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या कर्जाकरीता त्याच्याच कुटूंबातील (रक्त नात्यातील) व्यक्ती सहकर्जदार किंवा जामीदार राहिल्यास अशा प्रकरणांना व्याज परतावा करण्यात येईल. मात्र अर्जदाराचे नाव प्रथम कर्जदार म्हणून नमूद असणे अनिवार्य असेल.

९. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांने महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रात स्थायिक/ कार्यरत असलेल्या, CBS प्रणालीयुक्त व RBI च्या नियमांतर्गत कार्यरत असणाऱ्या बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य असेल.

१०. दिव्यांगासाठी योजनानिहाय एकूण निधीच्या ४ टक्के निधी राखीव ठेवण्यात येईल. यामध्ये अर्ज करणारा दिव्यांग व्यवसायाकरीता सक्षम असावा व या योजनेअंतर्गत प्रथम अर्ज करणाऱ्या दिव्यांगांस प्राधान्य देण्यात येईल.

११. या योजनेअंतर्गतचा लाभ हा कर्ज घेतल्यापासून कमाल ५ वर्षाकरीता तथा प्रत्यक्ष कर्ज कालावधी यापेक्षा जे कमी असेल त्यासाठी लागू असेल.

१२. दिनांक २० मे, २०२२ च्या निर्णयानुसार या योजनेची मर्यादा रु. १० लाखाहून रु. १५ लाखापर्यत वाढविण्यात आलेली असून, अशा प्रकरणांना रु. ४.५ लाखाच्या व्याज मर्यादेत परतावा करण्यात येईल. मात्र दिनांक २० मे,

२०२२ पूर्वीच्या L.O.I. धारकांना नियमानुसार रु. १० लाखाच्या मर्यादेतील व्याज परतावा करण्यात येणार असून त्याकरीता रु. ३ लाखाची मर्यादा असेल. या व्याज परतावा कालावधी जास्तीत-जास्त ५ वर्ष व व्याजाचा दर जास्तीत-जास्त द.सा.द.शे. १२% असेल.

१३. दिनांक ०१ एप्रिल, २०२१ च्या निर्णयानुसार या योजनेतंर्गत लाभ घेण्याकरीता लाभार्थ्यांने कर्ज मंजूर होण्याच्या दिनांकापूर्वी महामंडळाचे ऑनलाईन पात्रता प्रमाणपत्र (LOI) निर्माण केले असणे अनिवार्य असेल.

१४. उमेदवाराने निर्माण केलेले पात्रता प्रमाणपत्र (LOI) ६ महिन्यांच्या कालावधीकरीता निशुल्क वैध असून, त्यानंतर प्रती ३ महिन्याच्या कालावधीकरीता पात्रता प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्याकरीता लाभार्थ्यास रु. २५०/- शुल्क ऑनलाईन स्वरुपात अदा करणे अनिवार्य असेल. पात्रता प्रमाणपत्र १ वर्षाच्या कालाधीकरीता वैध राहून त्यानंतर ते SAVE AS DRAFT स्थितीत जमा होईल. तद्नंतर त्यांना पुनश्च: नव्याने अर्ज दाखल करणे गरजेचे असेल.

- **<u>अर्ज प्रणाली व अंमलबजावणीची पध्दत :</u>**

१. उमेदवाराने या योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्वप्रथम स्वत:ची www.udyog.mahaswayam.gov.in या वेब प्रणालीवर आधार कार्ड सहीत नोंदणी करणे अनिवार्य असेल.

२. या योजनेअंतर्गत अर्ज करण्याकरीता महामंडळाच्या वेब पोर्टलवर नोंदणी करते वेळीस, आधारलिंक मोबाईलवर O.T.P. द्वारे, मोबाईल ॲप द्वारे अथवा तत्सम U.I.D. युक्त प्रणालीद्वारे नोंदणी करावयाची आहे. यासाठी उमेदवाराने सध्याचा वापरात असलेला मोबाईल नंबर, आधार क्रमांकासोबत अद्यावत (LINK) करावा, कारण नोंदणी करताना सदरचा O.T.P. नमूद केल्याशिवाय नोंदणी प्रक्रीया पूर्ण होऊ शकत नाही.

३. उमदवाराने ऑनलाईन अर्ज भरुन Submit केल्याच्या पुढील सात दिवसांच्या आत (शासकीय सुट्टया वगळून) उमेदवार कर्ज व्याज परताव्याचा लाभ घेण्यासाठी पात्र आहे किंवा नाही किंवा त्यामध्ये असलेल्या त्रुटींबाबत महामंडामार्फत उमेदवारास SMS द्वारे कळविण्यात येईल. तद्नंतर संबंधित उमेदवार या योजनेअंतर्गत व्याज परताव्याचा लाभ घेण्यासाठी पात्र असल्यास संबंधित उमेदवाराला पात्रता प्रमाणपत्र (LOI) ऑनलाईन प्राप्त होईल.

४. अर्जकर्त्याने अटी व शर्ती मंजूर असल्याबाबतचे शपथपत्र ऑनलाईन फॉरमॅटमध्ये भरावयाचे आहे.

५. ऑनलाईन अर्ज करताना उमेदवारास महत्वाचे खालील दस्तावेज अपलोड करणे अनिवार्य असेल.

   I. **<u>आधार कार्ड-</u>** (अर्जदाराचा फोटो व आधार क्रमांक असलेली बाजू अपलोड करणे आवश्यक असेल.)

   II. **<u>रहिवासी पुरावा</u>**- (खालीलपैकी एक पुरावा जोडलेला असणे आवश्यक असेल) अद्यावत लाईट बील / अद्यावत गॅस कनेक्शन पुस्तक / अद्यावत टेलीफोन बील/ तहसिलदारांनी दिलेला रहिवासी दाखला / रेशन कार्डची प्रत / अर्जदाराचा अद्यावत पासपोर्ट ची प्रत / भाडे कराराची प्रत (उपरोक्त पैकी पुरावा जोडताना अर्जदाराच्या नावाचा नसेल तर संबंधिताशी असणारे नाते दर्शविणारा अन्य पुरावा जोडावा.)

   III. **<u>उत्पनाचा पुरावा</u>**-

   तहसिलदारांनी दिलेले अद्यावत कौटूंबिक उत्पन्नाचा दाखला किंवा

अद्यावत ITR ची प्रत अर्जदारासाठी आणि त्यांच्या/ तिच्या पती/ पत्नीसाठी (असल्यास) पती/ पत्नीची ITR ची प्रत जोडणे आवश्यक असेल.

IV. **<u>जातीचा पुरावा-</u>** जातीचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला.

V. **<u>एक पानी प्रकल्प अहवाल-</u>** ऑनलाईन उपलब्ध करुन दिलेल्या विवरणपत्रानुसार

६. लाभार्थ्याचा व्यवसाय सुरु झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत त्याच्या व्यवसायाचे फोटो महामंडळाच्या वेबप्रणालीवर अपलोड करणे अनिवार्य असेल.

७. या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त रु. ३ लाखाच्या मर्यादेत अथवा १२ टक्के कर्ज व्याज मर्यादेत महामंडळ व्याज परतावा करेल. म्हणजेच प्रत्येक लाभार्थ्याला जास्तीत-जास्त रु. ३ लाखापर्यंत व्याज परतावा देण्यात येईल.

८. कर्ज देणाऱ्या बँकेच्या EMI वेळापत्रकानुसार पुर्ण हफ्त्याची रक्कम बँकेत भरणा केल्यानंतर, त्यातील व्याजाची रक्कम हे महामंडळ लाभार्थ्याच्या खात्यामध्ये जमा करेल. यामध्ये लाभार्थ्यांने बँकेच्या EMI वेळापत्रकानुसार विहित वेळेमध्ये हफ्ता परतफेड करणे अनिवार्य असून हफ्त्याचा भरणा विहित वेळेमध्ये न भरल्यास त्या रक्कमेचा व्याज परतावा करण्याकरीता महामंडळ बांधील नसेल.

९. अर्जदाराने या अर्जीत प्रकल्पासाठी इतर कोणत्याही योजनेअंतर्गत, व्याज परतावा/माफी/Interest Subvention योजनेचा लाभ घेतलेला आढळल्यास, एकूण आवश्यक व्याज परतावा वजा इतर योजेनतून घेतलेला व्याजाचा लाभ एवढाच अनुज्ञेय असेल. (उदा. व्याज परतावा आवश्यकता १२% वजा इतर योजनेतून घेतलेला लाभ ५% आहे = ७% एवढा या योजनेतून मिळणारा लाभ असेल.)

१०. उपरोक्त मार्गदर्शक सुचना व शासन निर्णयामधील अटी व शर्तीनुसारच उमेदवारांना या योजनेचा लाभ देण्यात येईल.

****